Received
FIR COPY
K.P.

FORM-1A

N.C.R.B
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154221

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, पहिली खबर क्र. ०३, वर्ष २०२२ दिनांक ०८/०३/२०२२
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act म. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७, ७(अ)
(ii) अधिनियम Act -, कलमे Sections -
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections -

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार / बुधवार, तारीख पासून ०७/०३/२२, वेळ ११.०१, तारीख पर्यंत ०७/०३/२२, वेळ १३.२१
Occurrence of offence : Day, Date from ०८/०३/२२ Time, Date to, Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख ........, वेळ ........
Information received at P. S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०३/२०२२, तारीख ०८/०३/२२ वेळ ०२.५० वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ३ किमी, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki / Beat / O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव श्री लक्ष्मी विलास हॉटेलच्या समोर, शिवडी न्यायालयाचे बाहेर, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name दादर (पुर्व) No. if any मुंबई Ward Name of road

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव शरद कुंडलिक राऊत (b) वडिलांचे / पतीचे नाव कुंडलिक राऊत
Name Father's / Husband's Name

(c) जन्म तारीख व वय ३३ वर्ष (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९९६७०९२५२२६
Date of Birth and Age Nationality Phone No.

(e) पारपत्र क्रमांक -, दिल्याचा दिनांक -, दिल्याचे ठिकाण -, (f) व्यवसाय वकिल
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation

(g) धर्म Religion हिंदू, जात Caste -, जनजात Sub-Caste -

(h) पत्ता ९०५/१००७ गल्ली / सर्वे नं. स्वप्नपूर्ती सोसायटी, गाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ गटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.

रस्त्याचे नाव एकविरा म्हाडा संकुल, जवळचे प्रसिद्ध ठिकाण घोडपदेव, गाव भायखळा, पोस्ट ........ पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.

तालुका मुंबई ३३, जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र, सध्याचा पत्ता -
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

भरत लक्ष्मण मुंडे, वय ३३ वर्ष, धंदा- नोकरी - पोलीस उप निरीक्षक, ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई, रा.ठि. रूम नं ३०३, ३ बी, ट्रान्झीट कॅम्प, घाटकोपर (पुर्व) मुंबई



Scanned with CamScanner

यातील फिर्यादि श्री शरद कुंडलिक राउत, वय ३३ वर्षे यांचा स्वतंत्र जबाब नोंद करण्यात आला असुन तो सोबत जोडण्यात आला आहे.

समक्ष,

(संतोष गुर्जर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

KOR
8/3/2022

Scanned with CamScanner

फिर्याद दि. ०७/०३/२०२२.

श्री. शरद कुंडलिक राऊत, वय ३३ वर्षे, धंदा – वकील, रा.ठि. – १ एफ/९०७, स्वप्नपुर्ती सोसायटी, न्यु हिंद म्हाडा संकुल, घोडपदेव, भायखळा, मुंबई ४०००३३, मोबाईल नं. ९९६७९२५२२६.

---

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मागील सन २०१९ पासुन माझी पत्नी व मुलांसह राहावयास आहे. मी व्यवसायाने वकील असुन उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रॅक्टीस करीत आहे. त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

राजेंद्र शिरिषकर, वय ५९ वर्षे, रा.ठि. गोरेगाव, मुंबई हे माझे नातेवाईक असुन श्रीमती सुषमा म्हापणकर, वय अंदाजे ३३ वर्षे, रा.ठि. नालासोपारा, जि.पालघर हया देखील माझ्या नातेवाईक आहेत. श्रीमती सुषमा म्हापणकर व राजेंद्र शिरीषकर हे नात्याने मामा–भाची असुन, श्रीमती सुषमा हिला राजेंद्र शिरीषकर यांनी लहानपणापासुन म्हणजेच सन १९९८ पासुन सांभाळले आहे. श्रीमती सुषमा हिचे लग्न सन २००३ साली व्यक्ती नामे रितेश म्हापणकर यांचे बरोबर झाले आहे. रितेश म्हापणकर हा नात्याने माझा सख्खा चुलत मेहुणा आहे. श्रीमती सुषमा व रितेश म्हापणकर हे दोघेही राजेंद्र शिरीषकर यांचे मेसर्स मयुर इंटरप्रायसेस या कंपनीत नोकरी करीत होते. दरम्यान त्या दोघांनी नमुद कंपनीमध्ये सुमारे रू. ८ लाखांचा अपहार केला. सदरबाबत राजेंद्र शिरीषकर यांनी श्रीमती सुषमा व रितेश यांचे विरूध्द् दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक २२/०९/२०२१ रोजी तक्रारी अर्ज दिलेला आहे. त्यांनतर श्रीमती सुषमा व रितेश म्हापणकर आणि राजेंद्र शिरीषकर हे तिघेही माझे नातेवाईक असल्याने कोणाचेही नुकसान होवू नये म्हणुन मी या तिघामध्ये मध्यस्थी केली. त्यावेळी रितेश व श्रीमती सुषमा त्यांच्यावर गुन्हा दाखल होवू शकतो याबाबत समजावून सांगितले तेव्हा रितेश व श्रीमती सुषमा यांनी त्या दोघांनी मिळुन रू. ८ लाखांचा अपहार केला असल्याचे शिरीषकर यांचे कुंटुबियासमोर मान्य केले व अपहार केलेल्या रू. ८ लाखांपैकी रू. १,८०,०००/– इतकी रक्कम राजेंद्र शिरीषकर यांचा मुलगा नामे मयुर यांचे अकांऊट वर जमा केली. त्यानंतर उर्वरित रक्कमेचे चेक दिले आणि सदरचा अपहार त्यांनी केला असल्याबाबत स्टॅम्पपेपर वर लिहुन देवून कबुल केले. त्यामध्ये श्रीमती सुषमा व रितेश हे रू. ८ लाखापैकी उर्वरित रक्कम दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत राजेंद्र शिरीषकर यांना परत करतील अन्यथा राजेंद्र शिरीषकर हे श्रीमती सुषमा व रितेश म्हापणकर या दोघांवर गुन्हा दाखल करतील असे नमुद करण्यात आले होते.

श्रीमती सुषमा व रितेश यांना नमुद उर्वरित रक्कम राजेंद्र शिरीषकर यांना परत करण्याची इच्छा नव्हती. परंतु राजेंद्र शिरीषकर हे ठरल्याप्रमाणे रक्कम परत न केल्यास त्या दोघांवर गुन्हा दाखल करतील हि भिती मनात ठेवुन श्रीमती सुषमा व रितेश यांनी मिळुन राजेंद्र शिरीषकर यांचे विरूध्द् ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे श्रीमती सुषमा म्हापणकर हिचेवर लैंगिक अत्याचार केल्याबाबतचा खोटा तक्रारी अर्ज सादर केला. सदर तक्रारी अर्जाच्या चौकशीबाबत ना.म.जोशी पोलीस ठाणेचे पोउनि भरत मुंडे साहेब यांनी राजेंद्र शिरीषकर यांना चौकशीसाठी दिनांक २८/०२/२०२२ रोजी सायंकाळी पोलीस ठाणेस बोलाविले, तेव्हा मी देखील शिरीषकर यांचे कुंटुबियांसोबत ना.म.जोशी पोलीस ठाणे येथे पो.उपनि. मुंडे साहेबांना भेटलो. त्यावेळेस श्रीमती सुषमा व रितेश देखील पोलीस ठाण्यात आले होते. त्यावेळेला श्रीमती सुषमा हिने शिरीषकर यांचेकडे एक करोड रूपयांची मागणी केली व जर तिला एक करोड रूपये दिले नाही तर ती राजेंद्र शिरीषकर यांचे विरूध्द् बलात्काराचा गुन्हा दाखल करेल असे सांगितले. परंतु त्यावेळेस तिला असे पैसे देण्याबाबत मी हरकत घेतली. त्यामुळे श्रीमती सुषमा माझेवर चिडली होती. शिरीषकर यांनी माझे सांगण्यावरून तिला पैसे न दिल्यामुळे श्रीमती सुषमा हिने दिनांक ०१/०३/२०२२ रोजी राजेंद्र शिरीषकर यांचे विरूध्द् बलात्काराचा गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा दाखल करताना राजेंद्र शिरीषकर यांचेवर पोक्सो कायदयांअर्तगत गुन्हा दाखल न करण्याकरीता तसेच राजेंद्र शिरीषकर यांच्या तीन मुलांविरूध्द् देखील बलात्काराचा गुन्हा न दाखल करण्यासाठी पोउनि मुंडे साहेब यांनी त्यांचे स्वत:साठी व त्यांच्या वपोनि केवळे साहेब यांच्यासांठी मिळुन रू. ५ लाख लाचेची मागणी केली. परंतु त्याला मी नकार दिला.

दिनांक ०२/०३/२०२२ रोजी सायंकाळी पोउनि मुडे साहेब यांनी मला पोलीस ठाणेस बोलावून सांगितले की, जर तुम्ही श्रीमती सुषमा यांच्या म्हणण्यानुसार तिला पैसे दिले नाहीत, तर ती राजेंद्र शिरीषकर यांच्या तीन मुलांबरोबर माझ्या नावे देखील बलात्काराची तक्रार देईल व असे होवू दयायचे नसेल तर श्रीमती सुषमा हिला रू. ५० लाख व पो. उपनि. मुंडे साहेब यांच्यासाठी रू. ५ लाख व वपोनि केवळे साहेबांसाठी अडीच लाख रूपये लाच दया असे सांगितले. त्यावेळी माझ्यावर बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल होईल म्हणून मी घाबरून गेलो होतो. पैशाच्या मागणीसाठी पोउपनि. मुंडे साहेब व श्रीमती सुषमा म्हापणकर यांचे सतत व्हॉट्सअॅपवर कॉल येवू लागल्यामुळे मी घाबरून माझे विरूध्द् गुन्हा दाखल होवू नये म्हणुन भितीपोटी दिनांक ०३/०३/२०२२ रोजी माझा मेहुणा राहुल म्हापणकर यांच्याकरवी मी पोउपनि. मुंडे साहेब यांना रू. ५०,०००/– दिले.

मला लोकसेवक पोउनि मुंडे यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने मी दि. ०४/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक

Scanned with CamScanner

विभागाकडुन पो.नि. संतोष गुर्जर व स.पो.आ. श्रीमती उज्वल वैद्य यांना नेमण्यात आले. त्यावेळी पोनि संतोष गुर्जर यांनी मुंडे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा संगणकावर टंकलिखीत केलेला तक्रार अर्ज घेतला व त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर पोनि गुर्जर यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि गुर्जर यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. गुर्जर यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. गुर्जर यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला व पंचांसमक्ष ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथील पोलीस उप निरीक्षक भरत मुंडे यांची प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी माझी पडताळणी पथकाशी ओळख करून दिली. तसेच पडताळणी कारवाईसंदर्भातील प्राथमिक सोपस्कार झाल्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला लोकसेवक पो.उप.नि. भरत मुंडे हे कर्तव्यावर आहे किंवा कसे? याबाबत लोकसेवक मुंडे यांना मोबाईलवर संपर्क करण्यास सांगितले. त्यावरुन मी माझा मो.न. ९९६७९२५२२६ वरुन लोकसेवक पो.उप.नि. मुंडे यांचा मो.न. ८४२१२०८५५५ वर कॉल करुन माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, मी लोकसेवकास ' नमस्कार मुंडे साहेब...कुठे आहात...' अशी विचारणा केली असता, त्यावर लोकसेवक मुंडे यांनी 'मी पोलीस स्टेशनलाच आहे' असे उत्तर दिले. त्यानंतर मी लोकसेवक यांना ' अच्छा एक दहा ते पंधरा मिनिटामध्ये येतोय ' असे बोललो. लोकसेवक यांनी 'हा.. या...' असे म्हणुन कॉल बंद केला. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. गुर्जर यांनी पो.अ. मठपती यांच्या मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केलेले आहे.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी दोन्ही पंचांना व मला सदर पडताळणी कारवाईच्या वेळेस मला लोकसेवकाची भेट घेण्यापुर्वी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून माझे शर्टचे आत बनियनला लावणार असल्याचे सांगितले. तसेच पो.नि. गुर्जर यांनी मला माझे सोबत पंच क्र. १ सचिन शिरोसे हे जाणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी पडताळणी पथकातील अमंलदार यांना आयोजीत करण्यात येणाऱ्या पडताळणी व त्यापुढील कारवाईसाठी लागणारी साधन सामुग्री घेवुन शासकीय वाहन क्र. एमएच–०४–एएन–३६०८ यामध्ये मी, पो.नि. गुर्जर स.पो.आ. वैद्य, आम्ही पंच, पो.ना. गावडे, पो.ना. मठपती व पो.ह.चा.क्र. हाटकर असे बसलो. त्यावेळी पो.नि. गुर्जर यांनी पडताळणी/सापळा पथकातील उर्वरीत अंमलदारांना व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात सरकारी वाहन क्र. एमएच.०४.एएन.३५७० चे चालक पो.ना.चा. शिवथरे यांचेसह पुढील आदेशापर्यत थांबून राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर नमुद पोलीस वाहनाने ला.प्र.वि. कार्यालयातून बाहेर पडुन सर पोचखनवाला रोड, वरळी नाका, महालक्ष्मी रेल्वे स्टेशन रोडने सातरस्ता येथे आल्यानंतर के.के.मार्ग, जेकोब सर्कल, मुंबई येथील भारत हॉटेलच्या समोर आलो असता, पोनि. गुर्जर यांचे सुचनेवरुन वाहन रस्त्याच्या कडेला थांबविण्यात आले.

त्यानंतर मला पो.नि. गुर्जर यांनी पो.उप.नि. भरत मुंडे यांची प्रत्यक्ष भेट घेण्याकरीता ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे पडताळणीकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टचे आतील बनियनला लावून पंच क्र. १ सचिन शिरोसे यांचे सह पाठविले असता, मी पंच शिरोसे यांच्यासोबत ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गेलो, त्यावेळी मी लोकसेवक मुंडे यांना माझे मोबाईलवरून व्हॉट्सअप कॉल केला व मी पोलीस ठाणेस आलो असल्याचे कळविले. तेव्हा लोकसेवक मुंडे यांनी मला 'दोन मिनींटातच आलो' असे बोलुन फोन कट केला. काहीवेळातच लोकसेवक मुंडे हे मला भेटले. त्यावेळी मला त्यांनी पंच शिरोसे यांच्याबाबत विचारणा केल्यावर मी लोकसेवक मुंडे यांना ते क्लार्क असुन माझे ज्युनिअर असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक मुंडे यांनी पंच शिरोसे यांना बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावर पंच शिरोसे पोलीस ठाणेच्या बाहेर जावुन थांबले. त्यानंतर लोकसेवक मुंडे यांनी मला त्यांचे सोबत घेवुन पोलीस ठाणेचे पाठीमागील बाजुस असलेल्या अधिकारी यांच्या चेजिंग रूममध्ये घेवुन गेले. त्यानंतर माझे सोबत लोकसेवक मुंडे यांनी पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयासंदर्भात चर्चा केली, चर्चेदरम्यान मी लोकसेवक मुंडे यांना 'ती माझ अॅलीगेशन करते आहे का प्रॉपर' असे विचारले असता, लोकसेवक मुंडे यांनी मला ' तुमच भी आहे, कस आता थोडा विचार करुन तुमच करायला लागेल...मयुरचा तर विषय नाही मयुरला तर....तिने जस दिल ना ....पुन्हा स्टेटमेन्ट घेवून मयुरला उचलायच...'' असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक मुंडे यांना ' आता ती सपोज ती अॅग्री झाली फोटी ला तर तिला किती दयायचे चाळीस लाखामधले ' असे विचारणा केली असता, लोकसेवक मुंडे यांनी मला 'दाखल गुन्हयातील फिर्यादी श्रीमती सुषमा हिला चाळीस लाखामधील तीस लाख रूपये देवुन उर्वरित दहा लाख रूपये आपण वाटुन घेवुन असे मला म्हणाले. त्यावर मी लोकसेवक मुंडे यांना 'तुमच पाच व माझे पाच लाख' असे विचारले असता, लोकसेवक मुंडे यांना 'हू' असे उत्तर दिल्यावर मी त्यांना ' माझ्या पाच लाखाच आपण नंतर बघू' असे म्हणालो. त्यानंतर आमच्यामध्ये दाखल गुन्हयाच्या संदर्भात चर्चा झाली. त्यादरम्यान मी लोकसेवक मुंडे यांना तुमचे जे काय पैश्यांच आहे ते सोमवारी आणून देतो असे सांगितल्यावर, लोकसेवक मुंडे यांनी मला ' सिनिअर साहेबाच तुम्ही आताच जे करायच ते करुन टाका'

Scanned with CamScanner

असे म्हणाले, त्यावर मी 'किती' असे विचारणा केल्यावर लोकसेवक मुंडे यांनी मला ' त्यांना आपण अडीच बोलो होतो ना...ऐवढ तरी करुन टाका त्यांच आता ' असे उत्तर दिले. त्यावर मी 'चालेल दोन लाखाच करून टाकतो ... ठिक आहे' त्यावर लोकसेवक मुंडे यांनी मला 'कधी येताय' असे विचारले असता, मी त्यांना 'येतो पंधरा मिनीटात' असे बोलुन तेथुन निघुन पोलीस ठाणेच्या बाहेर आल्यावर पंच शिरोसे यांच्यासह ठरल्याप्रमाणे पोलीस वाहन थांबलेल्या ठिकाणी टॅक्सीने परत आलो.

त्यानंतर पोनि गुर्जर यांनी पो.ना. मठपती याच्यांमदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद केला व झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डर पुन्हा पोना मठपती यांच्या मदतीने पुन्हा चालु करून त्यामधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. नमुद संभाषणात लोकसेवक पोलीस उप निरीक्षक भरत मुंडे याने पडताळणी दरम्यान माझेकडे ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र.४२/२०२२ मधील फिर्यादी श्रीमती सुषमा म्हापणकर हिला रू.३०,००,०००/– व पो.उप.नि. मुंडे यांनी स्वतःकरीता रू.५,००,०००/– व वपोनि केवळे यांच्याकरीता रू.२,००,०००/– असे एकुण रू. ३७,००,०००/– इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व मी लोकसेवक पोउपनि मुंडे यांना सोमवार पर्यत लाचेची रक्कम आणुन देण्याकरीता वेळ मागितली असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला लोकसेवक मुंडे यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले असुन पुढील सापळा कारवाई करीता मला दिनांक ०७/०३/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे लोकसेवक मुंडे यांनी मागणी केल्याप्रमाणे रुपये ३७,००,०००/– घेवुन येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे आज दिनांक ०७/०३/२०२२ रोजी मी माझे वैयक्तिक बचतीमधून शिल्लक रुपये ४,५०,०००/– इतकी रक्कम त्यामध्ये (भारतीय चलनाच्या ५०० दराच्या ६३० नोटा, २०० दराच्या १०० नोटा तसेच १०० दराच्या ११५० नोटा) लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे घेवुन आलो व मी पो.नि. गुर्जर यांना इतकीच रक्कमेची व्यवस्था झाली असल्याचे सांगितले. त्यावर पो.नि. गुर्जर यांनी उर्वरित रू. ३२,५०,०००/– इतक्या किंमतीच्या रू. २०००/– दराच्या १६२५ खेळण्यातील डमी नोटा स.पो.आ. प्रशासन यांचे कार्यालयातून उपलब्ध करून घेत असल्याबाबत मला सांगितले. त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ४,५०,०००/– (भारतीय चलनाच्या ५०० दराच्या ६३० नोटा, २०० दराच्या १०० नोटा तसेच १०० दराच्या ११५० नोटा) त्यांनी स्वतःचे ताब्यात घेतल्या व त्यांच्या झेरॉक्स काढल्या. व उर्वरित रू. २०००/– दराच्या १६२५ खेळण्यातील डमी नोटा असे स.पो.आ. प्रशासन यांच्याकडून उपलब्ध करून घेतले.

त्यानंतर पो.नि. गुर्जर यांनी लाचेची रक्कम रूपये ४,५०,०००/– खऱ्या नोटा व रू. २०००/– किंमतीच्या एकूण ३२,५०,०००/– किंमतीच्या डमी नोटा रक्कमेस पोना कावले यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, त्यांनी सदरच्या सर्व नोटांच्या दोन्ही बाजूस कापसाच्या बोळयाने अॅन्थ्रासीन पावडर लावली व अॅथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर पो.नि. गुर्जर यांचे सुचनेवरून पोना कावले यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावलेले रूपये २,००,०००/– (रू. ५००/– दराच्या ४०० चलनी नोटा) एका हिरव्या रंगाच्या पाकीटात ठेवले. त्यावर पेन्सिलने वर्तुळात २स असे लिहीलेले आहे. पोना कावले यांनी दुसऱ्या हिरव्या रंगाच्या पाकीटात रू. ५,००,०००/– ( रू. ५००/– दराच्या २३० चलनी नोटा व रू. २००/– दराच्या १०० चलनी नोटा, रू. १०० दराच्या ११५० नोटा तसेच रू. २०००/– दराच्या १२५ डमी नोटा ) त्यावर पेन्सिलने वर्तुळात ५स असे लिहीलेले आहे व तिसऱ्या हिरव्या रंगाच्या पाकीटात रू. ३०,००,०००/– (रू. २०००/– दराच्या १५०० डमी नोटा) ठेवल्या. त्यावर पेन्सिलने वर्तुळात ३०स असे लिहीलेले आहे. सदर तिन्ही पाकीटास पोनि गुर्जर यांच्या सुचनेप्रमाणे पोना कावले यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावली व नंतर सदरचे पैशाचे पाकिट माझ्या जवळील चॉकलेटी रंगाच्या नाकोडा ज्वेलर्स असे लिहीलेल्या हॅन्ड बॅगमध्ये ठेवले. पो.नि. गुर्जर यांनी आम्हा पंचाना पोना कावले यांनी लाचेच्या नोटांना अॅन्थ्रॉसीन पावडर लावली असल्याने ते सापळा कारवाईत प्रत्यक्ष भाग घेणार नाही असे सांगितले.

त्यानंतर पोनि गुर्जर यांनी लोकसेवक पोउपनि मुंडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझ्या डोळ्यावरील चष्मा काढून डाव्या हाताने रूमालाने घाम पुसण्याचा असा पुर्व नियोजीत इशारा करावा, त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर मला लोकसेवक मुंडे यांना पोलीस ठाणेस प्रत्यक्ष भेटण्यासाठी जाण्यापुर्वी पो.नि. गुर्जर यांचे सुचनेनुसार पोना मठपती यांनी दोन्ही पंचासमक्ष डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून तो चालू करुन माझे शर्टच्या आतील बनीयानच्या आतील बाजुस लावला.

ना.म.जोशी पोलीस ठाणेस येथे गेल्यानंतर मी लोकसेवक मुंडे यांचेबाबत विचारणा केली असता, लोकसेवक कार्यालयात नसल्याचे समजले. म्हणून मी लोकसेवक मुंडे यांना त्यांचे मोबाईलवर व्हॉटसअप कॉल करून मी पोलीस ठाण्यास आले असल्याचे सांगितले. तेव्हा लोकसेवक मुंडे यांनी मला भारतमाता पेट्रोलपंपाजवळ येण्यास सांगितल्याचे पंच

Scanned with CamScanner

क्र. १ शिरोसे यांनी पोनि गुर्जर यांना सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र. १ पुन्हा शासकीय वाहनात येवून बसलो व सापळा पथक भारतमाता पेट्रोलपंपाकडे जाण्यास रवाना झालो. तेथे पोहचल्यावर मी पुन्हा लोकसेवक मुंडे यांना त्यांचे मोबाईलवर व्हॉटसअप कॉल करून मी भारतमाता पेट्रोलपंपाजवळ आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक मुंडे यांनी मला परेल सेन्ट्रल रेल्वे वसाहतीच्या बाजूस असलेल्या पेट्रोलपंपाजवळ बोलाविले. त्यामुळे मी व पंचासह सापळा पथक परेल पेट्रोलपंप येथे रवाना झालो. परेल पेट्रोलपंपाच्या अलीकडील मुख्य रस्त्यावर मी व पंच क्र. १ शिरोसे हे चालत पेट्रोलपंपाकडे रवाना झालो तेव्हा पंच क्र. १ शिरोसे हे माझे मागे काही अंतर ठेवून चालत होते.

त्यावेळी लोकसेवक मुंडे हे काही अंतरावर मला भेटले व मला लोकसेवक मुंडे यांनी त्यांचे दुचाकी नं. एम.एच. ३६–एम–८४५ या ग्रे रंगाच्या होंडा शाईन दुचाकीवर बसवून घेवून निघाले. तेव्हा लागलीच सापळा पथक त्यांचा पाठलाग करीत निघाले. त्यानंतर लोकसेवक मुंडे यांनी परेल ब्रिजवर त्यांचे दुचाकी थांबविली व मला गाडीवरून खाली उतरले. तेव्हा आम्हा दोघांमध्ये लाचेच्या रक्कमेबाबत संभाषण चालू झाले. त्यावेळी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम त्यांचे सॅगमध्ये ठेवण्यास सांगितले. परंतु मी त्यांना मला तहाण लागली असल्याचे सांगुन पुढे हॉटेलमध्ये थांबुन लाचेची रक्कम देतो असे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा लोकसेवक यांचे दुचाकीवर बसलो व लोकसेवकाने दुचाकी चालू करून पुढे जावु लागलो. आमचे मागे सापळा पथक पाठलाग करीत होते.

पुढे लोकसेवक मुंडे यांनी त्यांची दुचाकी लक्ष्मी विलास हॉटेलच्या समोर, शिंदेवाडी येथे थांबवली. तेव्हा पुन्हा मी लोकसेवक मुंडे यांचे दुचाकीवरून खाली उतरून लोकसेवक यांचेबरोबर संभाषण करू लागलो. त्यादरम्यान मी माझे शर्टचे खिशातील मोबाईल काढून लोकसेवक मुंडे यांचे जवळ दिला. त्यानंतर मी तेथे जवळच असलेल्या झाडाच्या चौथऱ्यावर माझे हातातील चॉकलेटी रंगाची हॅन्डबॅग ठेवून त्यातून लाचेची रक्कम असलेली दोन हिरव्या रंगाची पाकीटे (एका पाकीटामध्ये रू.५,००,०००/– व दुसऱ्या पाकीटामध्ये रू.२,००,०००/–) अशी एकुण रू. ७,००,०००/– लाचेची रक्कम काढून लोकसेवक मुंडे यांचे समोर धरली. त्यावेळी लोकसेवक मुंडे यांनी ती दोन पाकीटे त्यांच्या उजव्या हातात घेवून त्यांच्या राखाडी रंगाच्या सॅकमध्ये ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांनी पर्वनियोजित इशारा केला असता, त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक मुंडे यांना पकडले. त्यानंतर त्यांचे सॅगमधील ठेवलेली लाचेची रक्कम रू. ७,००,०००/– पंचानी ताब्यात घेतली.

माझे नातेवाईकाविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात मला सह आरोपी न करण्याकरीता व बलात्काराचा गुन्हयातील फिर्यादी हिने माझे विरूध्द तक्रार करू नये याकरीता लोकसेवक भरत मुंडे यांनी स्वत:करीता रू. ५,००,०००/–, वपोनि केवळे यांचेकरीता रू.२,००,०००/– व बलात्काराच्या गुन्हयातील फिर्यादी हिचेकरीता रू. ३०,००,०००/– असे एकुण ३७,००,०००/– लाख इतकी लाचेची मागणी करून रू. ७,००,०००/– स्विकारण्याचे मान्य करून नमूद लाचेची रक्कम रू. ७,००,०००/– आज रोजी माझेकडून स्वीकारली. म्हणुन माझी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक भरत मुंडे यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक पोलीस उप निरीक्षक - भरत मुंडे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( संतोष कमलाकर गुर्जर ),

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील तक्रारदार हे व दि. यातील फिर्यादी यांचे नातेवाईक विरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यात फिर्यादी यांना सहआरोपी न करण्याकरीता व बलात्काराच्या गुन्ह्यातील फिर्यादी हिने तक्रार करु नये याकरीता आरोपीताने स्वतःकरीता रु. ५ लाख व पोनि यांचे करीता रु. २ लाख व बलात्काराच्या गुन्ह्यातील फिर्यादी हिचे करीता रु. ३० लाख असे एकूण रु. ३७ लाख लाचेची मागणी केली. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून पडताळणी केली असता आरोपीताने रु. ३७ लाख लाचेची रक्कम स्विकारण्याचे असल्याचे कबूल केल्याने दि [illegible]/०३/२२ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपीताने स्वतःकरीता रु. ५ लाख व पोनि यांचे करीता रु. २ लाख असे एकूण रु. ७ लाख लाचेची रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून त्यांच्या विरुद्ध भ्र. प्र. अधि. १९८८ ~~कलम~~ ७, ७(अ) अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........
District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

INSPECTOR OF POLICE ANTI CORRUPTION BUREAU MUMBAI

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name संतोष [illegible]

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting

Code No. of I. O. ..........

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner